**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/१२/२०१९**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रश्न क्र.</th><th>मा. सदस्यांचे नाव</th><th>प्रश्नाचे उत्तर</th></tr>
<tr><td>१)</td><td>१७२</td><td>सौ. आभा विजयकुमार पांडे</td><td>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td>1</td><td>म.न.पा. तील वैद्यकिय अधिका-यांना खाजगी दवाखाने उघडता येऊ शकते का ?</td><td>शासन निर्णय मवैअ – 2011/प्र.क्र.626/11 सेवा – 3 मंत्रालय मुंबई दि. 7 ऑगस्ट 2012 तसेच म.न.पा. स्थापना विभाग आदेश क्र. 168/ओ.ॲन्ड. एम. दि.21.3.2016 अन्वये खाजगी दवाखाने उघडता येत नाही.</td></tr>
<tr><td>2</td><td>म.न.पा.तील किती वैद्यकिय अधिका-यांचे खाजगी दवाखाने आहेत ?<br>व नियमाप्रमाणे म.न.पा. सेवेत असतांना खाजगी दवाखाने चालवू शकतात का ? या संदर्भातले नियमाची सविस्तर माहिती देण्यात यावी.<br><br>ज्यांचे खाजगी (वै.अधिका-यांचे) दवाखाने आहेत ते Sonography Centre चालवू शकतात का ? जे Sonography Centres सुरु आहेत त्यांना म.न.पा. तर्फे प्रमाणित केले आहे का ?<br><br>वैद्यकीय अधिका-यांनी खाजगी दवाखाने चालविण्याकरीता Fire च्या NOC घेतले आहे का ?</td><td>मनपातील कार्यरत वैद्यकिय अधिका-यांचे 03 आंतररुग्णालये, 03 बाहयरुग्णालये (ओपीडी क्लिनीक) व 1 पॅथॉलॉजी लॅब आहे.<br>शासन निर्णय तसेच म.न.पा. आदेश (संबंधीत) नुसार नियमाप्रमाणे म.न.पा. सेवेत असतांना वैद्यकिय अधिकारी यांना कोणत्याही प्रकारे खाजगी, स्वतंत्र वैद्यकिय व्यवसाय करता येणार नाही, असे नमुद आहे. याबाबत शासन निर्णय व म.न.पा. आदेशाची प्रत सलग्न करण्यात येत आहे.<br>शासन निर्णय व म.न.पा. आदेश नुसार म.न.पा.तील वैद्यकिय अधिकारी खाजगी वैद्यकिय व्यवसाय करु शकत नाही. त्या अनुषंगाने सोनोग्राफी केंद्र चालवू शकत नाही. जे सोनोग्राफी केंद्र सुरु आहेत अशा केंद्राना पी.सी.पी.एन.डी.टी. कायदयाअंतर्गत म.न.पा. तर्फे प्रमाणीत करण्यात आलेले आहेत.<br>अग्निशमन व आणिबाणी सेवा म.न.पा. द्वारे प्राप्त सुचीमध्ये अंतर्भुत कोलंबिया हॉस्पीटल यांचेकडे पूर्व Compliance Letter प्रमाणे दि.03/04/2016 पर्यंत वैधता असलेले प्रमाणपत्र उपलब्ध्◌ा आहे. अग्निशमन विभागामार्फत दि.18/08/2017 रोजी चे पत्रान्वये कार्यवाही करण्यात आल्याचे नमुद आहे. अन्य दोन आंतर रुग्णालयाचे प्राप्त सुचीत नमुद नाही.</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

**हस्ता/- निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/१२/२०१९**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ. क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
| २) | १७३ | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | १) | नागपुर शहरातील विविध मेंन्टनन्स(बोरवेल, उद्यान, रस्ते व इतर देखभाल दुरूस्तीची) कामे कंत्राटदाराकडुन पुर्ण केली जातात. ही कामे पुर्ण रित्या झाली किंवा नाही याकरीता कोणत्या अधिकाऱ्यांचे नियंत्रण असते व त्या कामांची देयके मंजुर करतांना कंत्राटदारांनी काम पुर्ण केले किंवा नाही ? याची शहानिशा कशाप्रकारे केली जाते, या करीता कोणत्या अटी/शर्ती नुसार देयके मंजुर करून देण्यात येते. | मा. सदस्य यांचे प्रश्नातील लोककर्म विभागाशी संबधित मुद्दयाबाबत सादर करण्यात येते की, महानगरपालीकेच्या लोककर्म विभागातर्फे रस्ते, ड्रेनेज, इमारती व इतर देखभाल दुरूस्तीची कामे कंत्राटदारामार्फेत केली जातात. सदर्हु कामे पुर्ण रित्या झाली किंवा नाही या करीता चे व्यवस्थेत स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कनिष्ठ अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांचे नियंत्रण असुन कंत्राटी कामे कंत्राटदारामार्फेत कार्यान्वित करतांना कामे कंत्राटातील स्पेसिफिकेशन प्रमाणे व कामांच्या आवश्यकतेनुसार पुर्ण होत असल्याची शहानिशा संबंधित स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कनिष्ठ अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांचे मार्फेत करण्यात येते. केलेल्या कामांचे मोजमाप परिमाणा नुसार कनिष्ठ अभियंता यांनी नोंदविल्यानंतर आवश्यक पडताळणी उप. अभियंता द्वारे करण्यात येते तदनंतर का.अ. यांचे द्वारे देयक अंतिमतः प्रमाणित केल्यानंतर वित्त विभागास भुगतानाकरीता सादर करण्यात येतात. |
| | | | २) | | |

**निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/१२/२०१९**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
| ४) | १७५ | श्री .प्रफुल्ल विनोदराव गुडधे | १) १ | नागपूर शहरातील नागपूर सुधार प्रन्यास बरखास्तीनंतर गुंठेवारी अधिनियमाअंतर्गत अनधिकृत अभिन्यास नियमितीकरण नागपूर मनपा करणार आहे काय | नागपूर सुधार प्रन्यासने शासनास दि ०५.१०.२०१९ रोजी सादर केलेल्या अहवालानूसार नागपूर सुधार प्रन्यासने ३८२२ अभिन्यासापैकी २०८४ अभिन्यास नियमितीकरण केलेले असून उर्वरीत अभिन्यास आवश्यक कागदपत्राची पुर्तता व पोचरस्ता उपलब्ध नसल्याने निकाली काढण्यात आल्याचे दिसून येते त्यामुळे नागपूर महानगरपालिकेकडे गुंठेवारी अधिनियमाअंतर्गत अनधिकृत अभिन्यास नियमितीकरणाकरीता सर्व कागदपत्रासह प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यावर गुंठेवारी नियमाअंतर्गत तपासणी गुणवत्तेनूसार निर्णय घेण्यात येईल . |
| | | | २) | असल्यास मनपाकडे नासुप्रने किती अभिन्यास नियमितीकरण करण्यासाठी पाठविले आहेत. | नागपूर सुधार प्रन्यासने गुंठेवारी अधिनियमाअंतर्गत अभिन्यास नियमीती करणाकरीता या विभागाकडे पाठविलेले नाहीत. तथापी महानगरपालिकेतर्फे आजमितीस गुंठेवारी अंतर्गत एकही अभिन्यास मंजुर केलेला नाही. |
| | | | ३) | याआधीच नासुप्रने अभिन्यास नियमितीकरण केले मात्र भुखंडांना (Release) दिलेले नाहित असे किती भुखंड आहेत. | नागपूर सुधार प्रन्यासने आजतागायत धारीका नागपूर महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेल्या असून त्यापैकी बहुतांशी धारीकेवर कार्यवाही करणेच्या व काही धारिकांवर कार्यवाही झालेली त्या असलेल्या धारिकांचा समावेश आहे. नासुप्रने अभिन्यास नियमितीकरण केलेल्या संपुर्ण धारीका अजुनही मनपाकडे हस्तांतरीत केलेल्या नसल्याने याबाबतचा निश्चित आकडा कळविणे तुर्त शक्य नाही. तथापी नासुप्रचे संगणकातील नोंदीनूसार प्राप्त प्रस्तावापैकी ज्या भुखंडांना अद्यापही भुखंड मुक्त् करण्याबाबतचे पत्र (Release) दिलेले नाही असे एकुण १९२२ भुखंड आहेत. |
| | | | ४) | गुंठेवारी अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी नागपूर मनपाकडे अतिरीक्त मनुष्यबळ आहे काय असल्यास त्याबाबतची माहिती देण्यात यावी | गुंठेवारी अधिनियमाची अंमलबजावणी ही सद्य:स्थितीत नगर रचना विभागातील महानगरपालिकेकडील उपलब्ध मनुष्यबळानूसार करण्यात येत असून, सद्य:स्थितीत या विभागात १- नगर रचनाकार, २ – उप अभियंता, ४- कनिष्ठ अभियंता, ४ - स्थापत्य अभियांत्रीकी सहा. व ३ - अतांत्रीक कर्मचारी याप्रमाणे कर्मचारी अधिकारी कार्यरत आहेत. या कार्यालयाचे पत्र क्र. ७१३, दि. २८.११.२०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासकडील एकुण १५ – स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, क. लि. ०६, चपराशी -०४, दत्तर बंद -०४ याप्रमाणे महानगरपालिकेकड प्रतिनियुक्तीवर पाठविणेची मागणी केलेली आहे. तसेच नासुप्र कडे असलेले अभिलेख कक्ष नागपूर महानगरपालिकेला जोपर्यंत कायमस्वरुपी अभिलेख कक्षाची सुविधा उपलब्ध होत नाही. तोवर उक्त अभिलेख कक्ष वापराकरीता उपलब्ध करुन देण्यात यावे असे नागपूर सुधार प्रन्यास यांना कळविण्यात आलेले आहे.तसेच नागपूर सुधार प्रन्यासकडील प्रतिनियुक्तीने मागणी करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे व्यतिरीक्त १५ स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणेबाबतच्या प्रस्तावावर संबंधीत विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे. |

**हस्ता/- निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/१२/२०१९**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ. क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|---|---|
| ५) | १७६ | श्री .नरेंद्र (बाल्या) गोविंदराव बोरकर | १) | नरसाळा आणि हुडकेश्वर या ठिकाणी अगोदर रिजलन प्लान (R.P.) तयार करण्याचे महाराष्ट्र शासनाने निर्देश दिले होते परंतु नंतर उपरोक्त प्लान रदद करण्यात आलेला होता. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने डी.पी. प्लान तयार करण्याचे निर्देश दिले असता त्या प्लानची प्रक्रीया कुठपर्यत आलेली आहे. याची सविस्तर माहिती देण्यात यावी | नागपूर जिल्हयाची प्रादेशिक योजना शासनाचे नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५(१) अन्वये शासन निर्णय क्र. टिपीएस-२४९८/१५०५/ प्र.क्र.२७३ / ९३ / नवी-९, दि.०६.०५.२००० अन्वये मंजुर केलेली असून उक्त प्रादेशिक योजना दि. १५.०६.२००० पासून अंमलात आलेली आहे. उक्त मंजुर प्रादेशिक योजनेमध्ये मौजा – नरसाळा- हुडकेश्वर (बु.) या गावांच्या दक्षिण विकास केंद्रामध्ये समावेश होता.<br><br>मौजा – नरसाळा- हुडकेश्वर (बु.) ही संपुर्ण महसुली गावाकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ३(१अ) मधील तरतुदीनूसार नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून शासनाने शासन निर्णय क्र. टिपीएस- १४१३ / १०५ / प्र.क्र. २१३ / नवी - ९, दि.१४.१०.२०१३ अन्वये घोषित केलेले आहे.<br><br>महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणून मौजा –हुडेकेश्वर (बु.) व नरसाळा या महसुली गावांचे क्षेत्र नागपूर महानगरपालिका हददीमध्ये समाविष्ट झाल्याने उक्त गावांची प्रारुप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३०(१) मधील तरतुदीनूसार शासनास मंजुरीस्तव पत्र क्र . मनपाना/ प्रा. वि. यो. हु.(बु.) व नरसाळा/कलम - ३०/नरवि/१३३, दि. १३.०४.२०१८ अन्वये सादर केलेली होती. उक्त विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-२४१८/ ८८४/प्र.क्र.८७/२०१९/नवी-९, दि. २७.०५.२०१९ चे पत्रान्वये शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये मंजुरी देण्यास नकार देवून नविन विकास योजना तयार करण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने नगर रचना विभागाने उक्त विकास योजना नव्याने तयार करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २३ अन्वये इरादा जाहिर करण्यास्तव उक्त प्रस्ताव मा. सभागृहाकडे सादर करण्यात आला असता मा. सभागृहाने उक्त प्रस्तावास दि. २३.०७.२०१९ रोजी झालेल्या सभेत ठराव क्र. ४११ अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे. सदर मंजुरीच्या अनुषंगाने अधिनियमाचा कलम २३ अन्वये महानगरपालिकेने इरादा जाहीर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | करणेबाबतची प्रसिध्दी दि. ०५.०९.२०१९ रोजी दैनिक वर्तमानपत्र हितवाद व लोकमत यामध्ये करण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण) यामध्ये दि. ०९.०९.२०१९ रोजी प्रसिध्दी करण्यात आलेली आहे.<br><br>महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१ अन्वये नविन विकास योजना तयार करणेअंतर्गत उक्त अधिनियमाच्या कलम २४ अन्वये नगर रचना अधिकारी नियुक्त करण्याबाबत नगर रचना विभागाचे पत्र क्र. मनपाना/नरवि / प्रा.वि.यो.हु.(बु.) व नरसाळा/ कलम -२४/५५९, दि. २६.०९.२०१९ अन्वये सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांना कळविण्यात आलेले आहे.<br><br>त्याअनुषंगाने नागपूर शहराची दुस-यांदा सुधारीत विकास योजना तयार करणेकामी विकास योजना विशेष घटकाच्या निर्मितीस शासनाने दि २७.०५.२०१९ अन्वये मंजुरी दिलेली असून त्यानूसार व हुडेकेश्वर आणि नरसाळा ही दोन्ही गावांची विकास योजना शासनाकडील कलम १५४ अन्वयेच्या निर्देशानूसार नागपूर शहराच्या सुधारीत करावयाच्या विकास योजनेसोबत करावे किंवा कसे याबाबत मा. सहसंचालक, नगर रचना विभाग नागपूर यांनी मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दि. ३०.११.२०१९ रोजीचे पत्रान्वये मार्गदर्शित अपेक्षिलेले आहे . |

**हस्ता/- निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/१२/२०१९**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ. क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| ६) | १७७ | ॲड धर्मपाल मेश्राम | (खालीलप्रमाणे) |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | नागपूर म.न.पा.तर्फे दरवर्षी अंर्तराष्ट्रीय चित्रपट महोत्सव घेण्यात येतो त्याची काही निविदा काढण्यात आली काय? | नागपूर म.न.पा. तर्फे दरवर्षी अंर्तराष्ट्रीय चित्रपट महोत्सव घेण्यात येत नाही, तथापी सदर महोत्सव ऑरेंजसिटी कल्चरल फाऊण्डेशन यांचातर्फे घेण्यात येतो. सदर संस्थेस म.न.पा.चे आर्थिक अंदाजपत्रक मधील तरतुदाचे अधीन राहून सदर संस्थेस अंशदान उपलब्ध करून देण्यात येते.(एकूण येणाऱ्या खर्चेचा काही हिस्सा.) या अनुषंगाने स्थायी समिति यांचा मान्यतेने एकमुस्त अंशदान दिलेले आहे. |
| २) | म.न.पा. तर्फे हया महोत्सवावर आपण ज्या संस्थेला हे काम देण्यात येते त्या संस्थेच्या वतीने जी रक्कम सन २०१६-१७ व सन २०१७-१८ हया आर्थिक वर्षात खर्च करण्यात आली त्याची तप शि लवार माहिती देण्यात यावी? | म.न.पा. तर्फे कोणत्याही संस्थेला काम दिले जात नाही तथापी ऑरेंजसिटी कल्चरल फाऊण्डेशन संस्थेला अंशदान दिलेले आहे.<br>सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात म.न.पा.द्वारे आर्थिक अंदाजपत्रक मध्ये अंर्तराष्ट्रीय चित्रपट महोत्सव करीता तरतुद करण्यात आली नव्हती<br>सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात क्रिडा व सांस्कृतिक विभागाद्वारे एकूण रू. १०,००,०००/- अंशदान देण्यात आले. खर्चेचा तपशील परीशीष्ट - अ प्रमाणे जोडलेला आहे. |
| ३) | हया उत्सवात नागपूरातील किती कलाकारांच्या संस्थांना आजवर हयामध्ये अंतर्भुत करण्यात आले आहे? याची माहिति देण्यात यावी. | ऑरेंजसिटी कल्चरल फाऊण्डेशन यांचातर्फे दरवर्षी अंर्तराष्ट्रीय चित्रपट महोत्सव मध्ये देशी -विदेशी या चित्रपटांचे आकलन करून सर्वोत्तम आर्ट चित्रपट नागपूर शहरातील जनते करीता बिनामूल्य पाहण्यासाठी उपलब्ध करून दिले जातात. तसेच चित्रपट जगातले नावाजलेले दिग्दर्शक व इतर प्रसिध्द कलाकार यांच्या खुल्या मंचावर मुलाकाती घेण्यात येतात. |

परीशीष्ट - अ

आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये क्रिडा व सांस्कृतिक विभागाद्वारे अंर्तराष्ट्रीय चित्रपट महोत्सव करीता देण्यात आलेले अंशदानाची तपशील.

| अनु क्र. | महोत्सवाचे नांव | आयोजकाचे नांव | अनुदानित संस्थेचे नांव | देण्यात आलेले अंशदान (रू.) |
|---|---|---|---|---|
| १ | ऑरेंजसिटी इंटरनॅषनल फिल्म फेस्टीवल | ऑरेंजसिटी कल्चरल फाऊण्डेशन,नागपूर. | पुणे फिल्म फाऊण्डेशन पुणे | १०,००,०००/- |

परीशीष्ट - ब

आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये मनोरंजन विभागाद्वारे अंर्तराष्ट्रीय चित्रपट महोत्सव करीता देण्यातआलेले अंशदानाची तपशील.

| अनु क्र. | महोत्सवाचे नांव | अनु क्र. | आयोजकाचे नांव | अनुदानित संस्थेचे नांव | देण्यात आलेले अंशदान (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ऑरेंजसिटी इंटरनॅषनल फिल्म फेस्टीवल | १ | ऑरेंजसिटी कल्चरल फाऊण्डेशन नागपूर. | पुणे फिल्म फाऊण्डेशन पुणे | १५,००,०००/- |
| | | २ | | ऑरेंजसिटी कल्चरल फाऊण्डेशन नागपूर. | २,५२,०००/- |
| | | ३ | | ऑरेंजसिटी लिझर लिमिटेड,नागपूर. | १,९६,०००/- |
| | एकूण | | | | 19,48,000/- |

टिप:- स्थायी समिती ठराव क्र. ८४३/वि.क्र.८०७, दिनांकः-२८/०२/२०१९

**हस्ता/- निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा (विषय पत्रिकेवर न घेतलेला विषय)**

**दिनांक २०/१२/२०१९**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर | | |
|---|---|---|---|---|
| | | अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
| a) | श्री हरीश मोहन ग्वालबंशी . | १) | नागपूर शहराच्या बहुतांश परिसरात नागरीकांना मलवाहीनी, जलवाहीनी व इतर मुलभूत सुविधा उपलब्ध करुन दिली नसतांनाही नागरीकांना देण्यात येणा-या कर देयकांत मनपा कडून मलकर, जलकर व इतर कर का वसुल करण्यात येतो. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२८(अ)(१) च्या तरतूदीन्वये मालमत्ता कर मध्ये पाणी कर, पाणी लाभ कर, साफसफाई किंवा मलजल कर , मलजल लाभ कर, सामान्य कर, शिक्षण कर, पथ कर व विशेष सफाई कर समाविष्ट आहेत. वरील करांपैकी पाणी कर व पाणी लाभ कर हा कलम १३०(१) व १३०(२) च्या तरतूदीन्वये अनुक्रमे आकारण्यात येते. साफसफाई कर किंवा मलजल कर व मलजल लाभ कर हे कलम १३१(१) व १३१(२) च्या तरतूदीन्वये अनुक्रमे आकारण्यात येते, तसेच सामान्य कर हा कलम १३२ च्या तरतूदीन्वये आकारण्यात येते. महानगरपालिका शिक्षण कर व पथ कर हे कलम १४८(अ) व १४८(ड) च्या तरतुदीन्वये अनुक्रमे आकारण्यात येतात. तसेच अग्निशमन कर हा महाराष्ट्र शासन राजपत्र ६ ऑक्टोबर १९८३ अन्वये व वृक्ष कर हा म.न.पा. ठराव क्र. ६४ दिनांक २०.०७.२०१७ च्या अनुषंगाने आकारण्यात येतो.<br><br>महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर कायदा १९६२ अन्वये शासनाचा शिक्षण कर व रोजगार हमी कर महाराष्ट्र शासन कायदा सन १९७९ च्या तरतूदीन्वये मोठ्या निवासी इमारतीवर कर आकारण्यात येतो. |

**हस्ता/- निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा (विषय पत्रिकेवर न घेतलेला विषय)**

**दिनांक २०/१२/२०१९**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|
| b) | ॲड धर्मपाल मेश्राम | |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | परिवहन विभागाच्या वतीने मंजूर मार्गापैकी किती मार्गावरील बसेस नफ्यात धावत आहेत ? | नागपूर महानगरपालिका मार्फत संचालित शहर बस सध्या १२६ मार्गावर प्रवासी वाहतुक करते. त्यापैकी ०७ मार्गाचे उत्पन्न चागंले आहे. साधारणतः शहर बस वाहतुक नफ्यात राहत नाही. |
| २) | ज्या मार्गावरील बसेस तोटयात धावत आहे, त्या वाटेवरील तोटा न्युनतम करण्यासाठी प्रशासनाच्या वतीने काय निर्णय घेतले गेले ? | शहर बस वाहतुकीतील तोटा कमी करण्यासाठी खालील उपाययोजना केल्या जातात.<br>१) मार्ग तपासणी पथकाद्वारे दैनंदिन मार्गावर शहर बसेसची तपासणी / अकस्मात तपासणी केली जाते. माहे. एप्रिल २०१९ ते माहे. नोव्हेंबर २०१९ पर्यंत सदर तपासणीत एकूण ५९३ वाहकाविरूध्द अपराध प्रकरण नोंदविण्यात आले असून त्यांची आय.डी. बंद करून नियमानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.<br>२) मे. डिम्टस् ऑपरेटरचे आगार प्रमुख मार्फत वाहकासोबत प्रत्यक्ष संवाद साधुन उत्पन्नामध्ये वाढ करण्याबाबत नेहमी प्रशिक्षित करण्यात येत आहे.<br>३) प्रवासाच्या सुचना व गरजेनुसार मे. डिम्टस् ऑपरेटर मार्फत शहर बस वेळापत्रकाची पडताळणी करण्यात येत असते. तसेच माहे. मे २०१९ ते माहे. ऑगस्ट २०१९ या कालावधीत शहर बस वेळापत्रकाचे सुसुत्रिकरण सुध्दा करण्यात आले. |
| ३) | ज्या कंपन्या मनपाकडे कार्यरत आहेत त्या कंपन्याच्या तपशिलावर प्रगती अहवालाची माहिती उपलब्ध आहे काय ? त्याची माहिती ? | सद्यःस्थितीत शहर बस वाहतुकीमध्ये ०३ डिझेल बस ऑपरेटर, ०१ इलेक्ट्रीक बस ऑपरेटर, ०२ वाहकाचा पुरवठा करणारी ऐजेन्सी व हया ०६ ऑपरेटरचे संचालन / नियंत्रण करीता ०१ मे. डिम्टस् ऑपरेटरची नियुक्ती करण्यात आलेली आहे.<br>दैनंदिन शहर बस संचालनात बस, चालक, वाहक उपलब्ध नसल्यास किवा इतर अनियमितेबाबत करारनामामध्ये नमुद अटी नुसार पेनॉल्टी सुध्दा लावण्यात येत आहे. |

**हस्ता/- निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/१२/२०१९**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ. क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| ३) | १७४ | श्री. संदीप प्रल्हाद सहारे | |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | सन् २०१७ ते २०१९ आजपावेतोम.न.पा. नागपूर मुख्यालयात व झोन स्तरावर विविध उद्घाटने, शिबीर, प्रदर्शनी, पालकमंत्रांचे जनसंवाद कार्यक्रम, म.न.पा. मुख्यालयातील हिरवळीवर झालेले कार्यक्रम, विविध सभागृहातील कार्यक्रम, राष्ट्रीय कार्यक्रम, जयंतीचे कार्यक्रम मा. महापौर यांनी घेतलेले व इतर सर्व कार्यक्रमाबाबत तसेच इतर विविध संस्थांना किती अनुदान देण्यात आले आहे काय ? आले असल्यास या कार्यक्रमाच्या व्यवस्थेपोटी मंडपडेकोरेशन, आसनव्यवस्था, हार-फुल, जनरेटर, ध्वनीव्यवस्था, विद्युत उप करणे व इतर सर्व बाबींवर कार्यक्रम निहाय किती खर्च करण्यात आला ? या कार्यक्रमांचे कंत्राट देते वेळी निविदा किंवा कोटेशन आमंत्रित केले गेले काय? असल्यास याबाबत स्थायी समिती तसेच महासभेकडून मंजूरी घेण्यात आली का य? | सन् २०१७ ते २०१९ या कालावधीमध्ये कार्यक्रमा बाबत झोन क्र. १ ते १०, नगर अभियंता कार्यालय, मुख्य कार्यालय, समाजकल्याण विभाग व जनसंपर्क विभागकडील माहिती निगम सचिव विभागास देण्यात आलेली आहे.<br><br>वरील प्रमाणे विविध विभागाव्दारे करण्यात आलेल्या खर्चा संबंधीचा गोषवारा तयार करण्यात आला असुन या सहसंलग्न करण्यात येत आहे. |

**हस्ता/- निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**